# प्रेस नोट

## आरटीई २५ % अंतर्गत ऑनलाईन विद्यार्थी प्रवेश अर्ज स्विकारणेची प्रक्रिया सुरू

बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम 2009 अन्वये (वंचित गटातील बालकांना व दुर्बल घटकातील बालकांना प्राथमिक शिक्षणासाठी प्रवेश देणेसाठी जागा राखून ठेवण्याची रीत) नियम 2012 प्रमाणे अल्पसंख्यांक शाळा वगळता, राज्यातील सर्व विना अनुदानित, कायम विना अनुदानित व स्वयंअर्थसहाय्यता तत्त्वावरील प्राथमिक शाळांना सन 2012-13 या शैक्षणिक वर्षापासून शाळेच्या पहिलीच्या वर्गाच्या एकूण विद्यार्थी संख्येपैकी 25 % पर्यंतच्या जागा नजीकच्या परिसरातील वंचित गटाच्या व दुर्बल घटकांतील बालकांच्या प्रवेशासाठी राखून ठेवणे व अशा बालकांना त्यांचे प्राथमिक शिक्षण पूर्ण होईपर्यंत मोफत व सक्तीचे शिक्षण पुरविणे बंधनकारक आहे. या अंतर्गत सन 2020-21 या शैक्षणिक वर्षामधील पूर्व प्राथमिक व इयत्ता पहिलीसाठी 25 % आरक्षण प्रवेश प्रक्रिया महाराष्ट्र शासनाच्या https://student.maharashtra.gov.in या वेबसाईटवरील RTE Portal या लिंकवर ऑनलाईन पध्दतीने राबविणेत येत आहे. सदर प्रवेश प्रक्रियेअंतर्गत **दि.12/02/2020 रोजी दुपारी 4.00 पासून ते दि. 29/02/2020** या कालावधीत सामाजिक वंचित घटक (SC, ST, VJA, NTB, NTC, NTD, OBC, SBC, SEBC) / आर्थिक दुर्बल घटक / घटस्फोटीत तसेच विधवा महिलांचे पाल्य, अनाथ / दिव्यांग / एच.आय.व्ही. प्रभावित बालके इ. घटकांतील मुलांच्या प्रवेशासाठी पालकांकडून ऑनलाईन अर्ज स्विकारणेत येणार आहेत. सदर कालावधीनंतर ऑनलाईन प्रवेश अर्जासाठी मुदतवाढ दिली जाणार नाही याची पालकांनी नोंद घ्यावी.

आरटीई अंतर्गत 25 % आरक्षण मधून प्रवेश घेणा-या मुलांच्या पालकांना खालील कागदपत्रांची आवश्यकता आहे.

| अ.क्र. | कागदपत्रांचा प्रकार | वैध कागदपत्रांची सूची |
|---|---|---|
| 1 | जन्माचे प्रमाणपत्र (सर्व घटकांना अनिवार्य) | ग्रामपंचायत/ न.प./ म.न.पा. यांचा दाखला/ रूग्णालयातील ANM रजिस्टर मधील दाखला/ अंगणवाडी/ बालवाडीतील रजिस्टर मधील दाखला/ आई वडील अथवा पालकांनी प्रतिज्ञापत्राद्वारे केलेले स्वयंनिवेदन |
| 2 | निवासी पुरावा (सर्व घटकांना अनिवार्य) | रेशनिंग कार्ड / आधार कार्ड / ड्रायव्हींग लायसन्स / प्रॉपर्टी टॅक्स देयक / घरपट्टी / गॅस बुक / बँक पासबुक / पासपोर्ट / मतदान ओळखपत्र / वीज बिल / टेलिफोन बिल इ. यापैकी कोणतेही एक. भाडे तत्त्वावर राहणा-या पालकांच्या बाबतीत दुय्यम निबंधक कार्यालयाकडील नोंदणीकृत भाडे करारनाम्याची प्रत आवश्यक. |
| 3 | सामाजिक वंचित घटक (SC, ST, VJA, NTB, NTC, NTD, OBC, SBC, SEBC) यांचेसाठी पालकांचा / बालकांचा जातीचा दाखला / प्रमाणपत्र | तहसिलदार / उपजिल्हाधिकारी / उपविभागीय अधिकारी यांचा दाखला / प्रमाणपत्र (परराज्यातील जातीचे प्रमाणपत्र ग्राह्य धरण्यात येणार नाही.) |
| 4 | आर्थिक दुर्बल घटकांतील विद्यार्थ्यांच्या पालकांचा / विद्यार्थ्याचे पालन पोषण करणा-या व्यक्तीचा उत्पन्नाचा दाखला (रू. 1 लाख पेक्षा कमी उत्पन्नाचा) | तहसिलदार / नायब तहसिलदार दर्जापेक्षा कमी नसलेल्या महसुल अधिका-यांचा सन 2017-18 अथवा सन 2018-19 या आर्थिक वर्षाचा दाखला / सेलरी स्लिप / कंपनीचा किंवा Employer चा दाखला. |
| 5 | घटस्फोटीत व न्यायप्रविष्ट असलेल्या घटस्फोट प्रकरणातील महिलांच्या मुलांसाठी आवश्यक कागदपत्रे | १) न्यायालयाचा निर्णय अथवा प्रकरण न्यायप्रविष्ट असल्याचा पुरावा, २) बालकाच्या आईचा रहिवाशी पुरावा, ३) बालक वंचित गटातील असल्यास बालकाचे किंवा त्याच्या वडीलांचे जातीचे प्रमाणपत्र व बालक आर्थिक दुर्बल घटकातील असल्यास बालकाच्या आईच्या उत्पन्नाचा दाखला |
| 6 | विधवा महिलांच्या मुलांसाठी आवश्यक कागदपत्रे | १) पतीचे मृत्यू प्रमाणपत्र, २) बालकाच्या आईचा रहिवाशी पुरावा, ३) बालक वंचित गटातील असल्यास बालकाचे किंवा त्याच्या वडीलांचे जातीचे प्रमाणपत्र व बालक आर्थिक दुर्बल घटकातील असल्यास |

| | | |
|---|---|---|
| | | बालकाच्या आईच्या उत्पन्नाचा दाखला |
| 7 | अनाथ बालकांसाठी आवश्यक कागदपत्रे | अनाथ बालकांच्या बाबत अनाथालयाची कागदपत्रे ग्राहय धरण्यात यावीत. जर बालक अनाथालयात राहत नसेल तर जे पालक सांभाळ करतात त्यांचे हमीपत्र आवश्यक राहील. |
| 8 | एच.आय.व्ही. बाधित / एच.आय.व्ही. प्रभावित बालकांसाठी आवश्यक कागदपत्रे | जिल्हा शल्य चिकित्सक किंवा समकक्ष अधिका-यांचे प्रमाणपत्र |
| 9 | दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी अपंगत्व प्रमाणपत्र | जिल्हा शल्यचिकित्सक / वैद्यकीय अधिक्षक, अधिसुचित जिल्हा शासकीय रूग्णालय यांचे 40 % किंवा त्यापेक्षा जास्त अपंगत्व असल्याचे प्रमाणपत्र |
| 10 | बालकाचे छायाचित्र | अर्ज करणा-या बालकाचे पासपोर्ट साईज रंगीत छायाचित्र |

तरी कोल्हापूर जिल्ह्यातील इच्छुक पालकांनी RTE पोर्टलवर नमूद कालावधीत ऑनलाईन अर्ज करावेत असे आवाहन प्राथमिक शिक्षणाधिकारी, जिल्हा परिषद, कोल्हापूर यांनी केलेले आहे.

**(श्रीम. आशा उबाळे)**
**शिक्षणाधिकारी (प्राथमिक)**
**जिल्हा परिषद, कोल्हापूर**